
सकाळ ५-५-९.

वाहतूक कोंडीमुळे प्रवासी, नागरिक हैराण

# भाईंदर रेल्वे स्थानकाला रिक्षांचा विळखा

प्रकाश लिमये : सकाळ वृत्तसेवा

भाईंदर, ता. १६ : भाईंदर पूर्व रेल्वे स्थानक परिसराला रिक्षांचा विळखा पडला आहे. शहरातील रस्ते अरुंद असून, त्यात रस्त्यावरच उभ्या राहत असलेल्या रिक्षांमुळे या भागात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. या कोंडीने दररोज प्रवास करणारे तसेच आसपासचे रहिवासी पुरते हैराण झाले आहेत. या समस्येवर मार्ग काढावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



रिक्षाचालकांच्या बेशिस्तपणामुळे शहरात कोंडी होत आहे.

भाईंदर पूर्व भागात मोठ्या प्रमाणात लघुउद्योग कारखाने आहेत. त्यामुळे या परिसरात भाईंदर बाहेरून येणाऱ्या कामगारांची संख्या मोठी आहे. भाईंदर पूर्व भागात अगदी थेट इंद्रलोक, गोल्डन नेस्टपर्यंतच्या भागातील रहिवाशांना भाईंदर हे रेल्वेस्थानक जवळचे आहे. त्यामुळे भाईंदर पूर्व भागातून रेल्वे स्थानकात येणाऱ्यांची संख्या तुलनेत जास्त आहे. हे सर्व प्रवासी भाईंदर पूर्व भागातील बी. पी. रोड तसेच नवघर रोड या दोन रस्त्यांवरुन भाईंदर रेल्वे स्थानकात येत असतात. या दोन्ही रस्त्यावरून स्थानकात येण्यासाठी प्रशांत हॉटेल नाका ते बंदरवाडी नाका या रस्त्यावरच यावे लागते.

मुळातच हा रस्ता अत्यंत अरुंद आहे. त्यातच गेल्या काही वर्षांत रिक्षांची संख्या क्षमतेपेक्षा वाढली आहे. रिक्षा परवाने खुले असल्यामुळे भाईंदर पूर्व येथील रिक्षांची संख्या वाढली आहे. शिवाय दुचाकी, चारचाकी वाहनांची संख्या दिवसागणिक वाढतच आहे. याचा सर्व भार या अरुंद रस्त्यावर आहे. पूर्वी रेल्वे स्थानक परिसरातच रिक्षा स्टँड होता. त्यामुळे सर्व रिक्षा रेल्वेच्या संरक्षक भिंतीच्या आत उभ्या रहायच्या. मात्र, सध्या त्याठिकाणी रेल्वे पादचारी पुलाचे काम सुरू असून त्याचे सर्वसामान ठेवल्यामुळे हा स्टँड बंद करण्यात आला. परिणामी, सर्व रिक्षा बाहेर रस्त्यावरच उभ्या केल्या जातात.

भाईंदर पूर्व भागात आधीच रस्ता अरुंद आहे; त्यात रेल्वे पुलाचे काम सुरू असल्यामुळे नाईलाजास्तव रिक्षा रस्त्यावर थांबत आहेत. त्यामुळे होणारी कोंडी दूर करण्यासाठी वाहतूक पोलिसांची नेमणूक केली आहे. कोंडी सुरळीत व्हावी यासाठी पोलिस प्रयत्न करतात.
-देविदास हंडोरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग

रिक्षावाले बेशिस्तपणे रिक्षा उभ्या करत असल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. रिक्षाचालकांना काही सांगायला गेले तर ते अंगावर धावून येतात, शिवीगाळ करून भांडणे करतात.
-जितेंद्र जैन, नागरीक

म-टा-५-५-९.

# मित्राकडेच मागितली पाच कोटींची खंडणी

म. टा.वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

एका वाहनाला धडक दिल्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल होण्याची भीती मित्राला घालून त्याच्याकडे पाच कोटींची खंडणी मागणाऱ्या एकाला काशिमिरा पोलिसांनी नांदेडमधून अटक केली.

सत्यप्रकाश आर्य डिसेंबर महिन्यात गुजरातला गेला होता. त्यावेळी त्यांच्या वाहनाने एका दुचाकीला धडक दिली होती. त्याचा मित्र प्रशांत सवणेकर याला हे समजल्यानंतर, अपघात झालेला दुचाकीचालक हा गुजरातमध्ये रुग्णालयात दाखल असल्याचे प्रशांतने सत्यप्रकाश याला सांगितले. तसेच या प्रकरणात गुन्हा दाखल होऊ नये, यासाठी ४८ लाख रुपये मागून घेतले. त्यानंतर दुचाकीचालक मरण पावल्याचे सांगून कारवाई टाळण्यासाठी आपण स्वतःकडचे चार कोटी रुपये दिल्याचे सांगत, उर्वरित एक कोटी रुपये देण्याची मागणी त्याने सत्यप्रकाश याच्याकडे केली. सत्यप्रकाशने नकार दिल्याने त्याला धमकावण्यात आले. त्यामुळे सत्यप्रकाशने काशिमिरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यावरून गुन्हा दाखल करत प्रशांत याला काशिमिरा पोलिसांनी नांदेडमधून अटक केली.

Scanned with CamScanner

सकाळ ५-५-१९.

# वसईत लगाम गरजेचा

प्रसाद जोशी, वसई

लोकलने प्रवास करण्यासाठी नागरिक रिक्षांचा आधार घेतात. शहरात अधिकृत रिक्षातळ असून याठिकाणी प्रामाणिकपणे रिक्षा व्यवसायासाठी रांगेत चालक उभे असतात; मात्र, अनधिकृत रिक्षाचालक हे मोक्याच्या, सार्वजनिक गर्दी असणाऱ्या ठिकाणी बेशिस्तपणे रिक्षा उभ्या करून प्रवासी वाहतूक करत आहेत.

एकीकडे स्थानिक पोलिस प्रशासन कारवाई करत असले तरी मात्र दुसऱ्या दिवशी परिस्थिती 'जैसे थे' असते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी देखील निर्माण होत असते. वसई स्टेशन स्काय वॉक, बस डेपो मार्ग, अंबाडी सिग्नल मार्ग, माणिकपूर, वसई पूर्वेकडील नवघर, सातिवली, वालीवसह मुख्य मार्गाला रिक्षांचा विळखा कायम दिसून येतो.

## नालासोपाऱ्यात प्रवास धोक्याचा

नालासोपारा पूर्वेला तुळींज येथे पोलिस ठाण्याच्या नाकाला टिचून रिक्षा उभ्या केल्या जातात. त्यामुळे तुळींज मार्ग, ओसवाल मार्ग व आचोळे मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असते. जादा प्रवासी घेऊन धोकादायक प्रवास केला जातो. पश्चिमेला स्काय वॉकखाली रिक्षातळ असताना समोर प्रवाशांना घेण्यासाठी रिक्षा उभ्या केल्या जात असल्याने रस्ता अरुंद होत आहे. एकीकडे रिक्षा परवाने मिळाल्यामुळे रिक्षांच्या संख्येत वाढ झाली असताना त्यात अनधिकृत रिक्षांची भर पडली आहे. बेशिस्तपणे रिक्षा उभ्या केल्याने स्टेशन परिसरात कोंडी होते.

## जिल्ह्यातील अंदाजे तीन व सहा आसनी रिक्षा

| तालुका | तीन आसनी | सहा आसनी |
|---|---|---|
| पालघर | १५०० | ४०० |
| बोईसर | ५५०० | ५०० |
| वसई | १६००० | २००० |
| डहाणू | ९०० | १५० |
| वाणगाव | १०० | १०० |
| तलासरी | २०० | १५० |
| बोईसर | ५५०० | ५०० |
| सफाळे | २५० | १०० |
| मनोर | २५० | १५० |
| वाडा | १०० | १५० |
| विक्रमगड | ५० | १५० |
| जव्हार | ५० | १५० |
| मोखाडा | ५० | ० |

## बेकायदा कुरघोडी...

गेल्या चार वर्षात १८ हजार रिक्षा परवाने वितरित झाले आहेत, त्यामुळे रिक्षेच्या संख्येत वाढ होत आहे. परंतु हे अधिकृत असले तरी हे रिक्षावाले मात्र बेकायदा कुरघोडी करत असून, त्यांना लगाम घालण्याची आवश्यकता आहे. अन्यथा महामार्ग, शहरातील सार्वजनिक मार्गावर कोंडी फोडताना स्थानिक प्रशासनाला घाम फुटणार आहे.

## विरारमध्ये चालणे कठीण

विरार पूर्वेकडे रेल्वे स्थानक पूल, स्काय वॉक, अरुंद रस्ते आणि त्यात अनधिकृत रिक्षांची डोकेदुखी वाढत आहे. याठिकाणी उभ्या केलेल्या अस्ताव्यस्त रिक्षांमुळे नागरिकांना चालणे देखील मुश्किल होत आहे. स्थानिक प्रशासनाकडून या प्रकाराची तात्पुरती दखल घेतली जाते. मात्र, यावर कायमस्वरूपी तोडगा निघत नाही. पश्चिमेला मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रेल्वेतून ये-जा करणाऱ्या प्रवाशांनाही रस्त्यावरून चालताना अडचण होते. मनवेल पाडा, विरार भुयारी मार्ग परिसर, फुलपाडा येथेही अनधिकृत रिक्षांचा सुळसुळाट असतो.

रिक्षा तपासणीच्या वेळी बेकायदा रिक्षांवर कारवाई करण्यात येत आहे. गर्दीच्या ठिकाणी पोलिस तैनात केले आहेत.
-प्रशांत लांघी, पोलिस निरीक्षक

कागदपत्रे सोबत बाळगत नियमाला धरून रिक्षा व्यवसाय केला जातो. मात्र अनधिकृत रिक्षांमुळे अडसर निर्माण होतो. अशांवर कारवाई करावी.
-विजय खेतले, अध्यक्ष, ऑटो रिक्षा टॅक्सी चालक मालक महासंघ

जास्त भाडे आकारणे किंवा बेकायदा रिक्षा चालवणे यावर उपप्रादेशिक परिवहन विभागाचे पथक कारवाई करत असते.
-दशरथ वाघुले अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन विभाग

Scanned with CamScanner

लोकमत पु.पा.४.

# पोट तर वाढणारच, केवळ २५० रुपयांत तंदुरुस्त कसे राहणार?

## पोलिस दलातील कर्मचाऱ्यांत नाराजी; भत्ता वाढविण्याची मागणी

जितेंद्र कालेकर
लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : पोलिसांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. आपली प्रकृती निरोगी राहावी, यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी महिन्याला अडीचशे रुपये तंदुरुस्ती भत्ता दिला जातो. अवघ्या अडीचशे रुपयांत आपण प्रकृतीकडे कसे लक्ष देणार? यात वाढ करण्यात यावी, अशी मागणी आता पोलिसांमधून जोर धरू लागली आहे.

पोलिस दलातील कर्मचाऱ्यांना दरमहा अवघा अडीचशे रुपये इतका फिटनेस अर्थात तंदुरुस्ती भत्ता दिला जातो. या अडीचशे रुपयांत आज काय मिळते? यात वाढ करून किमान तो तीन हजार इतका करावा, तर सरकारचेही उद्दिष्ट यातून साध्य होईल, अशी अपेक्षा पोलिसांनी व्यक्त केली आहे. नाश्ता जरी केला तरी शंभर रुपये सहज खर्च होतात. मग अडीचशे रुपयांत महिनाभर आरोग्याची काळजी कशी घेता येईल, असाही सवाल व्यक्त होत आहे.



### पोलिसांना दर महिन्याला २५० रुपये तंदुरुस्ती भत्ता

राज्याच्या गृहविभागाकडून पोलिस दलातील अंमलदारांना दर महिन्याला अडीचशे रुपये फिटनेस भत्ता दिला जातो. इतक्या तुटपुंज्या रकमेतून फिटनेस कसा ठेवायचा, असा प्रश्न आहे.

### २००५ पासून भत्ता तेवढाच



पोलिसांनी तंदुरुस्त राहण्यासाठी २००५ मध्ये सुरु केलेल्या या भत्त्यात फारशी वाढ झालेली नाही. जवळपास १५ वर्षे उलटूनही या फिटनेस भत्त्यात वाढ झालेली नाही.

### कागदपत्रांची यादी मोठी

भत्ता जरी तुटपुंजा असला तरी तो मिळविण्यासाठी पोलिसांना बरेच पुरावे सादर करावे लागतात. बॉडी मास इंडेक्सप्रमाणे उंची आणि वजन यांचे कोष्टक यात असते. आपल्या आरोग्यासंबंधीच्या कागदपत्रांची जुळवाजुळव करीत, हा तंदुरुस्त भत्ता पदरात पाडून घ्यावा लागतो.

### २५० रुपयांत कसे तंदुरुस्त राहणार?

फिटनेसचा भत्ता द्यायचाच असेल तर त्यातील एक ते दीड हजार रुपये हे जिमसाठी खर्च होण्याइतपत आणि उर्वरित रक्कम पौष्टिक आहारासाठी खर्च होण्याइतपत तरी मिळावा.

\- कर्मचारी

चहा-नाश्ता करायचा झाला तरी दिवसभरात १०० ते १५० रुपये सहज खर्च होतात. महिन्याला सध्या मिळणाऱ्या भत्त्यातून दररोज केवळ साडेआठ रुपये वाट्याला येतात. यातून काय मिळते? याचाही विचार व्हावा.

\- कर्मचारी

### असे असते फिटनेस

- वजन आणि उंची योग्य प्रमाणात असेल तर पोट दिसत नाही.
- एखाद्याची उंची १७३ सें.मी. असेल तर त्यातून १०० वजा केल्यास ७३ किलो वजन अपेक्षित असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

लोकमत पा.नं.२.

धारावीपेक्षा दादर-माहीम भागात रुग्णसंख्या अधिक

# सावधान, कोरोना पुन्हा डोके वर काढतोय

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : एकीकडे इन्फ्लूएंझामुळे सामान्यांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना आता कोरोना पुन्हा डोके वर काढत असल्याचे आढळून येत आहे. दादर आणि माहीम भागात कोरोनाबाधितांची संख्या वाढत असल्याचे मुंबई महापालिकेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. शहर आणि उपनगरांमध्ये गेल्या दोन आठवड्यांत कोरोनाच्या सक्रिय रुग्णांमध्ये २०० टक्क्यांनी वाढ झाल्याचीही नोंद आहे.

जी नॉर्थ विभागात कोरोना रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याची माहिती पालिकेने दिली आहे. मुंबईत काही दिवसांपूर्वी कोरोनाबाधितांची संख्या ५०च्या आत होती. मात्र, ही संख्या थेट १८५ वर पोहोचली आहे. गेल्या चोवीस तासांत रुग्णांच्या संपर्कातील २५२ अतिजोखमीच्या व्यक्तींचे निदान पालिकेने केले आहे. याविषयी अधिक माहिती देताना कोरोनाचे रुग्ण वाढत असले तरीही घाबरण्याची परिस्थिती नाही. यंत्रणेकडून खबरदारी घेऊन चाचण्यांमध्ये वाढ आणि अन्य सेवांची तरतूद केली जात आहे. मात्र, नागरिकांनी इन्फ्लूएंझा, कोरोना आणि एच३एन२ संदर्भातील लक्षणे असल्यास तातडीने तपासणी करावी, असे आवाहन पालिकेच्या आरोग्य विभागाच्या कार्यकारी अधिकारी डॉ. मंगला गोमारे यांनी केले.



### राज्यात एच३एन२ चे ११९ रुग्ण

राज्यभरात एच३एन२चे ११९ रुग्ण असल्याचे निष्पन्न झाले आहे. ७३ रुग्ण विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेत आहेत. तर इन्फ्लूएंझाच्या संशयितांची संख्या अडीच लाखांवर पोहोचली आहे. दरम्यान, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालानुसार राज्यात एच३एन२चा आणखी एक संशयित मृत्यू आहे. नागपूर येथील रुग्णांचा मृत्यू एच३एन२ मुळे झाला नसल्याचे मृत्यू विश्लेषण समितीने स्पष्ट केले आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पु.पा. ३.

# खून करणारा आरोपी सात वर्षानंतर गजाआड

## काशिमिरा गुन्हे शाखेची यूपीत कारवाई



**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नयानगर पोलीस ठाणे हद्दीत ७ वर्षांपूर्वी खून करणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिरा पथकाने गजाआड केले. सदर कारवाई यूतीत करण्यात आली.

नयानगर पोलीस ठाणे हद्दीत ९ जुलै २०१६ रोजी रईस रोशन अन्वर हुसेन यास आरोपी शानु कालिया उर्फ शाहनवाज आयज अहमद, सोहेल शेख, नौशाद ऊर्फ अली इर्शाद शेख खान व असद अहमद सिध्दीकी यांनी पुर्वीच्या वादाचा राग मनात धरुन त्याचा खून करून पुरावा नष्ट केल्याबाबत नयानगर पोलीस ठाण्यात भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१ ४०४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयात यापूर्वी शानु कालिया उर्फ शाहनवाज आयज अहमद, सोहेल शेख, नौशाद ऊर्फ अली इर्शाद शेख खान यांना अटक करण्यात आली होती व गुन्हयात पाहीजे आरोपी असद अहमद सिध्दीकी याचा पोलिसांकडून शोध घेणे सुरू होते. या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी असद अहमद सिध्दीकी याचा गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा यांच्याकडून तपास चालू असताना आरोपी हा गुन्हा केल्यापासून कौशंबी, उत्तर प्रदेश येथे राहत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा यांना मिळाली. त्यानुसार पो.नि. अविराज कुराडे यांनी स.फौ. किशोर वाडीले, हवालदार पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, अंमलदार प्रशांत विसपुते यांचे पथक नेमून आरोपी असद अहमद सिध्दीकी यास उत्तरप्रदेश येथून सोमवारी ताब्यात घेतले. या गुन्ह्याचा पुढील तपास नयानगर पोलीस ठाणे करत आहे.

पुढारी पु.पा. ३.

# गांजा विकणाऱ्या तिघांना अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमीरा पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या तिघांना काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे.

काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथक हे पेट्रोलिंग करीत असतांना मुन्शी कंम्पाउन्ड येथे पाण्याचे टाकीजवळ तीन इसम अंधारात संशयीत हालचाली करत असतांना दिसून आले. त्यांची विचारपुस करण्यासाठी जात असतांना ते दोघे पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. पोलीसांनी त्यांना जागीच पकडले. त्यांची चौकशी केली असता त्यांचेकडे गांजा हा अंमली पदार्थ असल्याचे सांगीतले. त्यांना नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव जावेद अक्रम खान, (२४ ), रमजान जलील अहमद अन्सारी (३३) , विशाल मल्लीनाथ मुरगुंडे (२४) , असे सांगीतले. तेव्हा त्याची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे अंमली पदार्थ गांजा असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्याचे वजन केले असता एक किलो पंधरा ग्रॅम भरले. मुद्देमाल जप्त करून त्या तिघांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यावेळी हा अंमली पदार्थ गांजा कोणाकडून घेतला याची विचारणा त्या इसमांकडे केली असता त्यांनी उत्तर देण्यास टाळाटाळ केली. गांजा हा अंमली पदार्थ घेवून स्वतःचे कब्जात बेकायदेशिर रित्या बाळगुन त्याची विक्री करत असतांना मिळून आल्यामुळे त्या तिघांचे विरुध्द एन.डि. पी.एस कायद्यानुसार काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

सामना पा.नं.२.

# मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत ओबीसींच्या सर्व सवलती देणार

## सरकारची विधानसभेत ग्वाही | अधिवेशनानंतर दिल्लीत टास्क फोर्सची बैठक

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) – मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत ओबीसींच्या सर्व सवलती आणि लाभ दिले जातील, अशी ग्वाही राज्य सरकारने आज विधानसभेत दिली. मराठा आरक्षणासाठी सरकार कटिबद्ध असून विधिमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर दिल्ली येथे जाऊन वकिलांची टास्क फोर्स आणि संबंधित सर्वांना एकत्र घेऊन बैठक घेतली जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. यासंदर्भातील न्यायालयीन लढ्यासाठी केंद्र सरकारची मदत घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

मराठा समाज आरक्षणाशी संदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर मुख्यमंत्री शिंदे यांनी सभागृहात उत्तर दिले. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण रद्द करण्यापूर्वी निवड झालेल्या, पण नियुक्ती न झालेल्या १५५३ उमेदवारांना अधिसंख्य म्हणून नियुक्ती देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मराठा आरक्षणातील २०१८ पासून ते ५ मे २०२१ पर्यंत काय करण्यात आले त्याची माहिती त्यांनी दिली.

आरक्षण रद्द झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची समीक्षा करण्यासाठी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांची समिती नियुक्त केली होती. या समितीने शिफारस केल्याप्रमाणे पुढची पावले टाकली जात आहेत. यात पुनर्विचार याचिका दाखल करणे, निष्कर्षाला आव्हान आणि एसईबीसी सवलतीबाबत आयोग नियुक्त करणे तसेच राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाकडेही दाद मागणे अशा अनेक गोष्टींवर कार्यवाही सुरू आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

मराठा समाजातील तरुणांना सोयीसुविधा मिळाव्यात, रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी नवीन योजना सुरू केल्या आहेत. यात कुणबी मराठा दाखले मिळावेत यासाठी समिती स्थापन केली आहे. मराठा समाज आरक्षण आंदोलनात शहीद झालेल्या तरुणांच्या कुटुंबातील २० व्यक्तींना राज्य परिवहन महामंडळात सेवेत दाखल करून घेतले आहे. कोपर्डी खून खटल्याची तातडीने सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत. मराठा आरक्षणासंदर्भात ज्येष्ठ, अनुभवी विधिज्ञांचा टास्क फोर्स गठीत करण्यात आला असून त्यात ॲड. हरीश साळवे, ॲड. रोहतगी, ॲड. पटवालिया, ॲड. विजयसिंह थोरात, ॲड. अक्षय शिंदे यांचा समावेश असल्याची माहितीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

पुण्यनगरी ५-पा-१.

# काशिमीरा येथून गुटख्यासह २६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**मीरा रोड :** काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत टेम्पोतून गुटखा वाहतूक करणाऱ्याला काशिमीरा गुन्हे प्रकटीकरण पथकाने चालकाला अटक करून २६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत घोडबंदर गावच्या रोडने एका टेम्पोतून प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखू ही विक्री करण्यासाठी वाहतूक करून घेऊन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार काशिमीरा गुन्हे प्रकटीकरण पथकाने सापळा रचून टेम्पो थांबवून तपासणी केलीअसता त्यात गुटख्याच्या गोण्या ठेवलेल्या दिसून आल्या. महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व मानवी आरोग्यास हानीकारक असलेला गुटखा पानमसाला व सुगंधी तंबाखूची विक्री करण्यासाठी वाहतूक करत असलेला टेम्पो पकडण्यात आला. टेम्पोच्या आतमध्ये कपडे असलेले पांढरे बॉक्स व त्याच्या आजूबाजूला गुटख्याचे बॉक्स लपवून हा गुटखा अहमदाबाद, गुजरात येथून विक्री करण्यासाठी घेऊन येत असताना काशिमीरा येथे पकडण्यात आला. टेम्पोमध्ये घरगुती सामान, गुटखा व टेम्पो असा एकूण २६ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

Scanned with CamScanner

लोकसत्ता ५-९-२.

# बनावट अंड्यांच्या टेम्पोमधून दारूची तस्करी उघड

## लाखोंची दारू जप्त

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने गुरुवारी कारवाई करून एक अनोख्या प्रकारची मद्य तस्करी उघडकीस आणली आहे. मद्य तस्करांनी एका टेम्पोत प्लास्टिकच्या हजारो बनावट अंड्यांच्या मागे मद्याचा साठा लपवून ठेवला होता. याप्रकरणी टेम्पो चालकाला अटक करून १८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील वाघोटे टोलनाक्याजवळ मनोर-कंचाड रोड येथे गुरुवारी सकाळी ६ वाजता परराज्यातील मद्याची चोरटी वाहतूक होणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाला मिळाली होती. त्यानुसार सापळा लावून संशयित टॅम्पो अडवून तपासणी करण्यात आली.

या टेम्पोत अंडी ठेवली होती. मात्र, तपासणीअंती सर्वच्या सर्व १६ हजार ८०० अंडी प्लास्टिकची आढळली. या अंड्यांच्या ट्रे मागे दादरानगर हवेलीतून तस्करी करून आणलेले विदेशी मद्य दडवण्यात आले होते. त्यात ३३६ बिअर आणि ९४९ लिटर विदेशी मद्याच्या बाटल्या होत्या. या कारवाईत हा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी आरोपी टेम्पोचालक कमलेश विश्नोई याला अटक करण्यात आली आहे. हा परराज्यातील मद्याचा साठा हा गुजरातमधील कैलास नावाच्या व्यक्तीच्या सांगण्यावरून आणल्याची माहिती मिळाली. या आरोपींविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम व अन्य कलमान्वये गुन्ह्य दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध घेणे चालू आहे. आरोपी टेम्पोचालकाला २८ मार्चपर्यंत राज्य उत्पादन शुल्क विभागाची कोठडी सुनावण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक सुधाकर कदम, उपअधीक्षक बाबासाहेब भूतकर यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाचे निरीक्षक शंकर आंबेरकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# शासकीय कर्मचाऱ्यांचा संप कायम

## सर्वसामान्य नागरिकांची कामे खोळंबली

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. या संपामुळे कर्मचारी कामावर येत नसल्याने विविध कामांनिमित्त येणाऱ्या नागरिकांची कामे खोळंबली आहेत.

मागील तीन दिवसांपासून जुन्या पेन्शन योजना लागू करण्यात यावी, अशी मागणी करीत वसईतील पंचायत समिती, तहसीलदार विभाग कर्मचारी, शिक्षण, भूमिअभिलेख, अशा विभागातील कर्मचारी संपावर आहेत. महसूल विभागातील कर्मचारी संपावर असल्याने करवसुली, दाखले, जमीन विषयक कागदपत्रे, दाखले पडताळणी, अशी कामे ठप्प झाली आहेत. तर, दुसरीकडे भूमिअभिलेख विभागातही मोजणीसाठीचे अर्ज, नकाशे, गटबुक मिळविणे व इतर कामांसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ लागली आहे. संपामुळे जवळपास मोजणीचे ५२ अर्ज प्रलंबित राहिले आहेत. पंचायत समिती, शिक्षण विभागातही कामकाज ठप्प असल्याने नागरिकांना रिकाम्या हाती परतावे लागत आहे.

शासनाने यावर लवकरात लवकर तोडगा काढावा व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## संपाच्या समर्थनार्थ शिक्षक उद्या सामूहिक रजेवर

**पालघर :** शासकीय सेवेत १ नोव्हेंबर २००५ पासून रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी यासह इतर १८ मागण्यांसाठी सुरू केलेल्या बेमुदत संपाला समर्थन देण्यासाठी संपात सहभागी न झालेल्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी शनिवार, १८ मार्चपासून रजा भरून शाळा पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

Scanned with CamScanner

# 5 करोड़ की फिरौती मांगने वाला दगाबाज दोस्त गिरफ्तार

**भायंदर :** अपने दोस्त को झांसा देकर उससे पांच करोड़ की फिरौती मांगने के आरोप में काशीमीरा पुलिस ने आरोपी को नांदेड़ से गिरफ्तार किया है। प्राप्त जानकारी के अनुसार 20 दिसंबर 22 को, शिकायतकर्ता सत्यप्रकाश पुरुषोत्तम आर्य अपने परिवार के साथ देवदर्शन के लिए गुजरात के जूनागढ़ गए, जहां उनका चार पहिया वाहन मोटरसाइकिल से टकरा कर दुर्घटनाग्रस्त हो गया। उस समय सत्यप्रकाश आर्य ने अपने मित्र प्रशांत सावणेकर नांदेड़ को घटना की जानकारी बताई तो दोस्त प्रशांत सावनेकर ने शिकायतकर्ता सत्यप्रकाश आर्य को व्हाट्सएप कॉल कर मामले को निपटाने उससे पैसे मांगे कि मोटर साइकिल सवार की तबीयत बहुत खराब है और वह इस समय जूनागढ़, गुजरात के एक अस्पताल में भर्ती है। जिससे शिकायतकर्ता डर गया और समय-समय पर पैसों का भुगतान बैंक के मार्फरत करता रहा।

बाद में जाकर प्रशांत सवणेकर ने शिकायतकर्ता को बताया कि मोटरसाइकिल सवार की एक दुर्घटना में मृत्यु हो गई है और उसने मामले को निपटाने के नाम पर 4 करोड़ पचा लिए। वसूली की मांग करते हुए कहा कि उसके पास अभी भी रुपये बकाया हैं। जिस पर तंग आकर काशीमीरा पुलिस स्टेशन में शिकायत किए जाने पर पुलिस ने धारा 386, 504, 506 के तहत मामला दर्ज किया गया। बाद में उच्चअधिकारियों के मार्गदर्शन में काशीमीरा पुलिस स्टेशन के अधिकारी एवं निरीक्षक ने तकनीकी जानकारी के आधार पर आरोपी प्रशांत सावणेकर को शिवराय नगर नांदेड़ से गिरफ्तार किया है। यह कार्यवाही परिमंडल 1 के पुलिस उपायुक्त जयंत बजबले, सहायक पुलिस उपायुक्त मीरा रोड, विभाग विलास सानप के मार्गदर्शन में काशीमीरा के वरिष्ठ पुलिस निरीक्षक संदीप कदम, उप पुलिस निरीक्षक निखिल चव्हाण तथा पुलिस कर्मियों द्वारा की गई।

# लाखों रुपये की ड्रग्स व चरस के

**वसई :** मार्च माह में 15 दिन में तीसरी बार पुलिस ने शहर में लाखों रुपये के नशीले पदार्थ जब्त किए है. शहर में इतनी बड़ी मात्रा में नशीले पदार्थ मिलने से हड़कंप मच गया है। क्राइम ब्रांच की यूनिट तीन की पुलिस ने बुधवार की रात क्राइम वॉच पेट्रोलिंग के दौरान दो आरोपियों को गिरफ्तार कर एमडी व चरस समेत लाखों




रुपये की नशीले पदार्थ जब्त की हैं। कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच यूनिट 2 के पी.आई शाहुराज रणवरे के नेतृत्व में पुलिस अधिकारी व कर्मचारी ने की है। आरोपी तौसीफ युसूफ पटेल (38) के कब्जे से

10 लाख
व मेहंदी मं
के पास से

चरस बरा
आरोपियों
000) रु

# अहम
# आधु
मुंबई
स्टेशनों क
स्टेशनों में
रही है। अ
तहत अप
के लिए दे
की पहचान
गुजरात में
सुविधाओं
स्टेशन के
सृजन के स
वृद्धि होगी

# कार

Scanned with CamScanner

लोकमत

# पोलिस ठाण्याचे आज उद्‌घाटन

नालासोपारा : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाअंतर्गत नायगाव पोलिस ठाण्याचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक रजनीश सेठ यांच्या हस्ते शुक्रवारी सकाळी अकरा वाजता करण्यात येणार आहे. नायगावच्या साई एन्क्लेव्ह इमारतीतील दुकानांमध्ये नायगाव पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे. पोलिस ठाणे उद्‌घाटनप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी केले आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 17, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# नालासोपाऱ्यातून लाखोंचे अमली पदार्थ पकडले

## गुन्हे शाखा युनिट-३ च्या पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : शहरात मार्च महिन्याच्या १५ दिवसांत तिसऱ्यांदा लाखो रुपये किमतीचे अमली पदार्थ पोलिसांनी पकडले आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ पुन्हा मिळाल्याने खळबळ माजली आहे. यामुळे ड्रग्स माफियांचा नालासोपारा शहरात सुळसुळाट सुरू असल्याचे पुन्हा एकदा निदर्शनास आले आहे.

गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांनी बुधवारी रात्री पेट्रोलिंग करताना दोन आरोपींना पकडून लाखो रुपये किमतीचे एमडी आणि चरस हे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. आचोळे पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करून मुद्देमाल जप्त केला आहे. गुन्हे शाखा युनिट-३ चे पोलिस अधिकारी आणि अंमलदार आचोळे पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुधवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास पेट्रोलिंग करीत असताना नालासोपारा-वसई लिंक रोडवरील चंदननाका येथे दोघे संशयास्पदरीत्या फिरताना दिसले. दोघांची दोन पंचासमक्ष अंग झडती घेतली असता आरोपी तोसिफ युसूफ पटेल (३८) याच्याकडे १० लाख रुपयांचे ५० ग्रॅम एमडी आणि मेहंदी मोहम्मद अली शिराजी (४२) याच्याकडे ६४ हजारांचे ८ ग्रॅम चरस असा एकूण १० लाख ६४ हजार रुपये किमतीचा अमली पदार्थ मिळून आला. दोन्ही आरोपीविरोधात एनडीपीएसअंतर्गत आचोळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 17, 2023
Powered by: erelego.com


Scanned with CamScanner

लोकमत

# रक्ताची गरज पडली तर कुठून घ्याल?

मंगेश कराळे | लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईत चार रक्तपेढी असून, जर रक्तदान केले असेल आणि त्याला जर रक्ताची गरज लागली तर निशुल्क भेटते. कोणी रक्तदात्याचे कार्ड घेऊन पेढीत रक्त घेण्यासाठी गेले तर त्याला सवलत मिळते. अनेकजण शिबिर आयोजित करून रक्त संकलनासाठी वसईतील रक्तपेढ्यांना न बोलवता मुंबईतील रक्तपेढींना बोलवतात, त्यामुळे सध्या वसईतील काही रक्तपेढीत रक्त नसल्याचे एका डॉक्टरांनी 'लोकमत'ला सांगितले. या पेढीवर अन्न व औषध प्रशासनानेही लक्ष देणे गरजेचे आहे.




## वसईत चार रक्तपेढ्या

वसईत चार शहरांमध्ये विजयी, सरला, साथीया, रिद्धिविनायक या चार रक्तपेढी आहेत. कोणत्या रुग्णाला रक्ताची गरज लागली तर रक्त मिळते; पण या पुरेसा साठा नसल्याचे सूत्रांकडून कळते.

## सहा महिन्यांनी तपासणी

वसईतील चारही रक्तपेढ्यांची दर सहा महिन्यांनी अन्न व औषध प्रशासनाचे ठाणे, पालघर किंवा सेंट्रलवरून टीम येऊन तपासणी केली जात असल्याचे एका डॉक्टरांनी 'लोकमत'ला सांगितले.

## रक्त संकलन करणे सोपे नाही



कुठल्याही बँकेसाठी रक्त एकत्रित करणे हे सोपे काम नाही. प्रसिद्ध व्यक्तींचे वाढदिवस, पुण्यतिथी, संस्थांचे वर्धापन दिन, सभा-संमेलने, दिनविशेष अशा सर्व प्रसंगांचे स्मरण ठेवून रक्तपेढीमधील कर्मचाऱ्यांना रक्तदान शिबिरांचे आयोजन करावे लागते.

## निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कारवाई?

वसईतील किती रक्तपेढ्यांनी निष्काळजीपणा केला म्हणून त्यांच्यावर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली की नाही, असे ऐकिवात नाही. तपासणीच्या वेळी येणारे अधिकारी किती नमुने घेतात, याचीही माहिती उपलब्ध नाही.

## रक्तपेढ्यांकडून असाही हलगर्जीपणा

रक्तदाता एचआयव्हीग्रस्त असल्यास पेढ्यांनी पुढील उपचारासाठी आयसीटीसी (इंटीग्रेटेड कॉन्सिलिंग अँड टेस्टिंग) केंद्रात पाठवणे बंधनकारक असते; परंतु काही रक्तपेढ्या हलगर्जीपणा करत असल्याचे सूत्रांकडून कळते.

## वसईतील पेढ्यांना सोबत घेऊन शिबिर करावे

वसईतील सेवाभावी संस्थांनी रक्तदान शिबिरे आयोजित करून वसईतील रक्तपेढ्यांना सोबत घ्यावे. त्यामुळे वसईतील रक्तपेढीत रक्ताचा मुबलक साठा उपलब्ध राहील. जेणेकरून कोणत्या रुग्णाला रक्ताची गरज लागली तर या पेढ्यांमध्ये रक्त उपलब्ध असेल.

- विजय महाजन, साथीया ब्लड बँक

Hello Vasai
Page No. 3 Mar 17, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner